लातूर भूकंप

LATUR BHUKAMP

संपादक: अशोक चिंचोले

सांज दैनिक : मंगळवार – १० नोव्हेंबर २०२६

वर्ष – ४० वे

अंक – २१२

पाने – ४

किंमत २ रूपये

E-Mail : dailybhukamp@gmail.com

RNI No. MAHMAR/2012/42770

☎ : -9422072823,251822

http://dainikbhukamp.com

मुंबई
पुणे
नाशिक
नागपूर
छ.संभाजीनगर
जळगाव
अहमदाबाद

FOR BOOKING
WhatsApp No.
88888 45404
CALL
88888 45403

विश्व ट्रॅव्हल्स लातूर.

पार्सल सेवा उपलब्ध ✆ 254002/242790

संपादकीय.....

दीन दीन दिवाळी...!

शेतकऱ्यांनी नाही केला पेरा तर काय खाशील धतूरा...! असे म्हटले जाते. या वर्षी शेतकरी पेरा करण्यासाठी आतूर होता; पण पावसाअभावी पेराच करता आला नाही. खरीप गेलं, रब्बीच्याही पेरण्या नाहीत तेंव्हा काय खायचे? हा मोठा प्रश्न निर्माण होऊ शकतो. आपल्या परिसरात ज्वारी अधिक खाल्ली जाते. ज्वारीचा भाव आज १०५ रूपये प्रति किलोपेक्षा अधिक झाला आहे. ईतर अन्नधान्याचे भाव तर वाढतच आहेत, पण त्याचा तुटवडा देखील निर्माण होऊ शकेल अशी वेळ येऊ शकते. दुष्काळी परिस्थितीमुळे खरीप हंगाम कोरडा गेला, रब्बीचा पेरा केला जाऊ शकत नाही, पिकाचे सोडा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर होत आहे. जुने जाणते, ज्येष्ठ नागरीक तर सांगताहेत १९७२ पेक्षा २०२६ चा दुष्काळ भयंकर आहे. दुष्काळ ही नैसर्गीक आपत्ती आहे. प्रश्न असा पडतो की नैसर्गिक आपत्ती काळात जनता, प्रशासन, राजकारणी, सरकार गांभीर्याने का घेतले जात नाही. यंदा भयंकर दुष्काळ आहे तसे म्हणावे तर प्रचंड आतिषबाजी, मोठे-मोठे सण उत्सव, प्रदर्शन, धार्मिक कार्यक्रम, वाहने, चैनीच्या वस्तू खरेदी करण्यासाठी गर्दी, हॉटेल, दारूची दुकाने, बार मध्ये बसायला, टपऱ्या हॉटेलसमोर उभे राहायला जागा पुरत नाही. ही गर्दी पाहून असेही म्हटले जातेय की, आपल्याकडे कुठे आहे दुष्काळ? प्रशासनाचे म्हणाल तर दुष्काळ म्हणून कोण पुढाकार घेऊन दुष्काळाच्या झळा कमी बसतील असा प्रयत्न केल्याचे दिसत नाही. दुष्काळसारख्या आपत्तीत देखील पैसे घेतल्याशिवाय काम होत नाही. दुष्काळ म्हणून प्रशासनाने शेतकरी, नागरिकांच्या घरात, झोपडीत जाऊन दिवाळी साजरी करायला हवी. प्रशासनातील पगारदारांनी आपल्या परिवारावर होणारा फटाक्याचा खर्च दुष्काळाच्या खाईत सापडलेल्यांच्या कुटुंबियांना दिला नाही. एवढेच काय शासकीय अधिकाऱ्यांचे बंगले आणि त्या बंगल्यावर करण्यात आलेली रोषणाई पाहिली तर कोणी म्हणणार नाही आपल्या जिल्ह्यात दुष्काळ आहे. सर्वात महत्वाची भूमिका सरकारची आहे. सरकार नैसर्गीक आपत्तीत सापडलेल्या शेतकरी, नागरिकांच्या हाताला काम कसे देणार आहे, पिण्याचे पाणी कोठून देणार आहे? याला जबाबदार एक सरकार आहे असे नव्हे तर जनतेच्या हिताचा जप करणारे सर्व पक्षांचे सरकार जबाबदार आहेत. दुष्काळ, टंचाई कायमच्या दूर करण्यासाठी काही ठोस निर्णय का केले जात नाही. लातूरसारख्या शहराला जगात कोठेच नाही असे रेल्वेने पाणी पुरवण्यात आले. नंतरच्या काळात लातूरकरांची, जिल्ह्यांची तहान कायमची भागविण्यासाठी काडीचेही नियोजन आणि प्रयत्न केले नाहीत. सरकार कोणाचेही असो ते जनतेला आश्वासन आणि तुटपुंज्या अनुदानाच्या आशेवर जगायला शिकवत आहे. आपला महाराष्ट्र एक तर ओल्या किंवा सुक्या दुष्काळाच्या चक्रव्युहात अडकला आहे. दुष्काळाचे चक्रव्यूह भेदण्याचा प्रयत्न कसा काय केला जात नाही? आव मात्र पुढच्या पिढीला दुष्काळ पाहू देणार नाही असा केला जात आहे. १९७२ चा दुष्काळ भयंकर होता. त्यावेळी रस्ते, तलाव व ईतर कामे काढून तत्कालीन सरकार जनतेच्या मदतीला धावून आले. आता परिस्थिती बदलली आहे. शारिरीक कष्टाची कामे करण्याकडे कल कमी दिसतो आहे. शिवाय हाताला काम म्हणजे काय द्यायचे हा प्रश्न आहे. तेंव्हा शेतकऱ्यांना २०२६ च्या दुष्काळात मदत करायची तर शेतीमधील कामासाठी रोजगार हमी योजना राबवावी. प्रत्येक गावच्या शिवारातील तलाव, गावतळे, नद्या, नाले, ओढे रूंद करून 'वॉटर बँक' तयार करण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. दुष्काळात पाणी टंचाई तीव्र जाणवत आहे. धान्य टंचाई एवढी जाणवणार नसली तरी महागाईने कळस गाठला आहे. अशा संकटाच्या वेळी एकमेकांचे दुःख वाटून घेण्यासाठी गाव पातळीवर सामुहिक प्रयत्न नियोजनाची गरज आहे. सर्वात महत्वाचे आमचे राजकारणी सत्ताधारी असो वा विरोधक हेच मुळात राजकारण करित असताना गंभीर नाहीत. राजकारणात, प्रशासनात एखाद्या छोट्या-मोठ्या पदावर असलेला व्यक्ती देखील पाच वर्षात कोट्याधीश होतो. त्याचे जीवनमान उंचावते, एखादी निवडणूक लढविण्यासाठी राजकारणी जसे सुक्ष्म नियोजन करतात, कार्यकर्ते, पैसा-यंत्रणेची जुळवाजुळव करतात. रात्रं-दिवस सतर्क राहून बुथ पातळीपर्यंत जशी खबरदारी घेतात तसे प्रयत्न नियोजन दुष्काळ निवारणासाठी करित नाहीत. वेगवेगळ्या पदावर काम करता-करता प्रशासनात राजकारण्यांप्रमाणे प्रस्थापितांचा मोठा वर्ग निर्माण झाला आहे. अशांनीही पुढच्या पिढीला पुन्हा दुष्काळ पाहू न देण्यासाठी प्रयत्न करायला हवे आहेत. दुष्काळाच्या चक्रव्युहातून या महाराष्ट्राला, मराठवाड्याला बाहेर काढण्याचे प्रयत्न का होत नाहीत? आमचे दिवाळी, दसरा हे सण आनंदाचे नव्हे तर दुःखाचे ठरत आहेत. दिवाळी हा सण दिन दिन दिवाळी...! म्हणून साजरा केला जायचा पण यावर्षीची दिवाळी 'दीन दीन दिवाळी ...' म्हणत साजरी करण्याची वेळ आली आहे. आजच्या दिवाळी निमित्त आपणा सर्वांना दुष्काळ या आपत्तीला कायमचे गाढण्याची त्याला सामोरे जाण्याची ताकत मिळो अशा शुभेच्छा.

लातूर जिल्हा बँकेचे मतदार सहलीवर

मतदारांचे मुल्य वाढतेय सोन्यासारखं

लातूर : लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक संचालक मंडळ निवडीसाठी १५ नोव्हेंबर रोजी मतदान आहे. अंतीम टप्प्यात आलेल्या या निवडणुकीमध्ये चुरस वाढली आहे. दोन्ही बाजूने सर्व शक्ती पणाला लावण्यात आली असून या बँकेचे बहुतेक सर्व मतदार 'दिवाळी' सारख्या महत्वाच्या सणाच्या कालावधीत सहलीवर असून त्यांना संपूर्ण दिवाळी 'घराबाहेर'च साजरी करावी लागत आहे.

लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत १९ जागेसाठी निवडणूक जाहीर झाली. उमेदवारी माघार घ्यायच्या दिवसापर्यंत चार जागा बिनविरोध आल्या आहेत. १५ जागेसाठी २९ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांच्या नेतृत्वात सहकार पॅनल 'शिट्टी' हे निवडणूक चिन्ह घेऊन निवडणूक लढवीत आहे तर महायुतीचे म्हणून रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज परिवर्तन पॅनल ताकतीनिशी 'कपबशी' हे निवडणूक चिन्ह घेऊन निवडणूक रिंगणात आहे.

परिवर्तन पॅनलने आमच्या उमेदवाराचे अपहरण करून दमदाटी करून उमेदवारी माघार घ्यायला लावली म्हणून गुन्हा दाखल केला आहे तर काल सहकार पॅनलने पोलीस ठाण्यासमोर ठिय्या आंदोलन केल्यानंतर निलंग्याचे माजी नगराध्यक्ष बाळू शिंगाडे व आणखी एक यांच्यावर सोसायटी मतदारास दमदाटी करून अपहरण केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शेवटच्या टप्प्यात निवडणूक वातावरण चांगलेच तापले आहे.

आम्ही लातूर जिल्ह्यातील विविध तालुक्यातील काही सोसायटी मतदारांच्या कुटुंबांशी संबंधीतांकडे मतदान कोठे आहेत असा संपर्क केला असता जवळपास सर्व ठिकाणाहून ते 'देवाला' गेले असा निरोप आहे. दोन्ही पॅनलच्या सौजन्याने मतदार सहलीवर असल्याची चर्चा आहे. एवढेच नव्हे तर मतदारांच्या मताचे मुल्य सोन्याएवढे वाढले अशी चर्चा आहे. आनंदाची दिवाळी सारखा सण असताना घरातील कर्ता माणूस घराबाहेर आहे. याबाबत मोजक्या कुटुंबात 'गम' पण बहुतेकांच्या 'खुशी'चे वातावरण दिसत आहे. पोलीस यंत्रणेचे मात्र या निवडणुकीने टेन्शन वाढविले आहे.

मतदान केंद्रं कोठे आणि किती

लातूर जिल्हा बँकेत होत असलेल्या १५ जागेसाठी २९ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. १५ नोव्हेंबर रोजी ९९९ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. मतदानासाठी जिल्ह्यात प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी एक असे १० मतदान केंद्र आहेत. मतदान केंद्र कोठे व त्या मतदान केंद्रावर एकूण किती मतदान हे पुढीलप्रमाणे. तहसील कार्यालय (महसूल हॉल) लातूर एकूण मतदान २६३, तहसील कार्यालय औसा (मिटींग हॉल) एकूण मतदान ११७, प्रशासकीय भवन इमारत उदगीर (तळमजला) खोली क्र. २ एकूण मतदार १०८, तहसील कार्यालय देवणी (सभागृह) एकूण मतदान ४६, तहसील कार्यालय जळकोट मिटींग हॉल एकूण मतदार ४८, तहसील कार्यालय (व्हि. सी. रूम) शिरूर अनंतपाळ एकूण मतदार ४३, तहसील कार्यालय अहमदपूर (तहसीलदार यांचे दालन) एकूण मतदार १०० आणि तहसील कार्यालय चाकूर (मिटींग हॉल) या केंद्रावर एकूण मतदार ६५, तहसील कार्यालय (महसूल हॉल) निलंगा एकूण मतदार १३७, तहसील कार्यालय (मिटींग हॉल) रेणापूर एकूण मतदार ७१ एवढे आहेत.

कर्करोगाची १३७ औषधी स्वस्त

नवी दिल्ली : भारत सरकारने कर्करोगाच्या रुग्णांना मोठा दिलासा दिला आहे. कर्करोगाच्या १३७ औषधांच्या किमती कमी करण्यात आल्या आहेत. या नवीन किमती आज ९ नोव्हेंबरपासून लागू करण्यात आल्या. एनपीपीएने या १३७ कर्करोगविरोधी औषधांसाठी व्यापार नफ्याची मर्यादा निश्चित केली. या किमती सुमारे ५० टक्क्यांनी कमी करण्यात आल्या आहेत. ५० हजार रुपये किमतीचे औषध आता फक्त २५ हजार रुपयांना उपलब्ध झाले आहे.

राष्ट्रीय औषध किंमत प्राधिकरणाने दिलेल्या माहितीनुसार आज ९ नोव्हेंबरपासून नवीन किमती लागू करण्यात आल्या.

उर्वरीत पान ४ वर...

बाबुराव हजारे यांचे निधन

लातूर : निलंगा येथील प्रा. बालाजी हजारे यांचे वडील बाबुराव रानबा हजारे (८३) यांचे आज सकाळी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर आज दि. १० नोव्हेंबर रोजी सायं. ५.३० वा. त्यांचे मुळ गाव बिबराळ, ता. शिरूर अनंतपाळ येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.



बिबराळ व परिसरातील एक कष्टकरी, प्रामाणीक, ईतरांच्या संकटात धावून जाणारे असे व्यक्तीमत्व होते. त्यांच्या निधनानंत हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. बाबुराव हजारे यांच्या पश्चात मुलगा, सून, चार भाऊ, पाच बहिणी असा परिवार आहे. बाबुराव हजारे यांच्या निधनाने हजारे कुटुंबियांवर कोसळलेल्या दुःखात दै. भूकंप परिवार सहभागी आहे.

साडेपाच लाखाचा गुटखा उदगिरात जप्त



लातूर : महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेल्या सुगंधित पानमसाला व तंबाखूजन्य पदार्थांची अवैध वाहतूक करणाऱ्या दोघांविरुद्ध उदगीर ग्रामीण पोलिसांनी धडक कारवाई केली आहे. या कारवाईत ५ लाख रुपये किमतीची मारुती सुझुकी स्विफ्ट डिझायर कार व ८१ हजार ९२० रुपये किमतीचा प्रतिबंधित गुटखा असा एकूण ५ लाख ८१ हजार ९२० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, ९ नोव्हेंबर २०२६ रोजी प्रतिबंधित पानमसाला व तंबाखूजन्य पदार्थांची अवैध वाहतूक होत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार बिदर गेट येथील गोल्डी बारसमोर, पोलिसांनी कारवाई केली. या कारवाईत महमद मगदुम पठाण (वय ३४ वर्षे), ताजखा अमजखा पठाण (वय २० वर्षे), दोघेही रा. वाढवणा, ता. उदगीर, जि. लातूर या दोघांना अटक करण्यात आली आहे.

हे महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेले सुगंधित पानमसाला व तंबाखूजन्य पदार्थ विक्रीच्या उद्देशाने वाहनातून वाहतूक करताना मिळून आले. पोलिसांनी आरोपींच्या ताब्यातून ५ लाख रुपये किमतीची मारुती सुझुकी स्विफ्ट डिझायर कार (क्र. एमएच १४ एचजी ३९४२) व ८१ हजार ९२० रुपये किमतीचा प्रतिबंधित पानमसाला व तंबाखूजन्य पदार्थ, असा एकूण ५ लाख ८१ हजार ९२० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी पोलीस ठाणे उदगीर ग्रामीण येथे गुरनं. ८००/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता कलम १२३, २२३, २७४, २७५, ६२, ३(५) तसेच अन्न सुरक्षा व मानके कायदा कलम ५९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक काळे करीत आहेत. ही कारवाई उदगीर ग्रामीण पोलीस ठाण्याचे प्रभारी पोलीस निरीक्षक डी. डी. गाडे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली.



दिवाळीच्या काळात वायुप्रदूषणात होणारी वाढ : फुप्फुसांच्या कार्यक्षमतेवर आणि श्वसनाच्या आरोग्यावर त्याचे काय परिणाम होतात?

फटाक्यांच्या धुरातून बाहेर पडणारे सूक्ष्म कण आणि घातक वायू श्वसनमार्गांना त्रास देतात आणि फुप्फुसांच्या आरोग्यावर परिणाम करतात. या प्रदूषणाच्या संपर्कात आल्यामुळे अल्पकालीन आणि दीर्घकालीन कोणते परिणाम होतात आणि हे नुकसान कालांतराने भरून निघते का, याविषयी तज्ज्ञांचे स्पष्टीकरण.

फटाक्यांच्या धुराच्या संपर्कात केवळ काही तास राहिल्यानेही खोकला, घरघर किंवा श्वास घेण्यास त्रास होऊ शकतो. विशेषतः दमा किंवा श्वसनसंस्थेचे अन्य आजार असलेल्या व्यक्तींना याचा अधिक त्रास होऊ शकतो. मात्र, या प्रदूषणाचे परिणाम केवळ आधीपासून श्वसनविकार असलेल्या व्यक्तींपुरते मर्यादित नाहीत. हवेतील सूक्ष्म कणांचे आणि विविध वायूंचे प्रमाण खूप वाढल्यास कोणत्याही व्यक्तीच्या श्वसनमार्गांना त्रास होऊ शकतो.

हवेचा गुणवत्ता निर्देशांक हा हवेतील विविध प्रदूषकांचे प्रमाण एका संख्येद्वारे दर्शविणारा निर्देशांक आहे. यामुळे हवा किती प्रदूषित आहे आणि त्याचा आरोग्यावर काय परिणाम होऊ शकतो, याची कल्पना येते. भारतातील केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ (CPCB) PM2.5, PM10, नायट्रोजन डायऑक्साइड, सल्फर डायऑक्साइड आणि कार्बन मोनॉक्साइड यांसह आठ प्रदूषकांच्या आधारे हा निर्देशांक मोजते.

भारताचा अधिकृत राष्ट्रीय AQI निर्देशांक ० ते ५०० या मर्यादेत असतो. त्यामध्ये ४०१ ते ५०० हा स्तर 'अत्यंत गंभीर' (Severe) प्रदूषणाचा मानला जातो. ही अधिकृत निर्देशांकाची कमाल मर्यादा आहे; प्रत्यक्ष प्रदूषणाची कमाल मर्यादा नव्हे. काही खासगी प्समध्ये वेगवेगळ्या - टख पद्धती आणि गणनांचा वापर केला जातो.

९ नोव्हेंबर २०२६ रोजी दिल्लीचा अधिकृत -टख सुमारे ३७० होता. हा स्तर 'अतिशय खराब' (Very Poor) या श्रेणीत येतो. दिल्लीतील अनेक निरीक्षण केंद्रांवर प्रदूषणाची पातळी 'अत्यंत गंभीर' या श्रेणीत नोंदवली गेली. दिवाळीच्या काळात चेन्नई, चेंगलपट्टू, श्रीगंगानगर, भुवनेश्वर, फरीदकोट आणि पुडुचेरी यांसह अनेक शहरांमध्ये खासगी वायुगुणवत्ता निरीक्षण व्यासपीठांनी - टख १,००० पेक्षाही अधिक असल्याचे नोंदवले.

हवेची गुणवत्ता आणि आरोग्य

PM10 सारखे तुलनेने मोठ्या आकाराचे कण प्रामुख्याने नाक, घसा आणि श्वसनमार्गाच्या मोठ्या भागात अडकतात; तर झच२.५ सारखे अतिसूक्ष्म कण फुप्फुसांच्या खोल भागापर्यंत पोहोचू शकतात, असे चेन्नई येथील अपोलो स्पेशालिटी हॉस्पिटल्सचे वरिष्ठ सल्लागार इंटरव्हेन्शनल पल्मोनोलॉजिस्ट डॉ. वल्लभनेनी विश्रवंभर सांगतात.

फटाके जाळल्यामुळे सल्फर डायऑक्साइड, नायट्रोजन ऑक्साइड्स, कार्बन मोनॉक्साइड आणि विविध आकारांचे सूक्ष्म कण असे अनेक प्रकारचे प्रदूषक हवेत मिसळतात. या कणांचा आकार किती आहे, यावर ते श्वसनसंस्थेच्या किती खोल भागापर्यंत पोहोचतील हे अवलंबून असते.

एमजीएम हेल्थकेअर, चेन्नई येथील वरिष्ठ सल्लागार इंटरव्हेन्शनल पल्मोनोलॉजिस्ट डॉ. आर. श्रीधर स्पष्ट करतात की, शरीरातील नैसर्गिक स्वच्छता यंत्रणा तुलनेने मोठ्या कणांना बाहेर काढण्यास मदत करते. मात्र, झच२.५ कण फुप्फुसांतील सूक्ष्म वायुपुटिकांपर्यंत (Alveoli) पोहोचू शकतात. याच वायुपुटिकांमध्ये ऑक्सिजन आणि कार्बन डायऑक्साइड यांची देवाणघेवाण होते. त्याहूनही सूक्ष्म कण रक्तप्रवाहात प्रवेश करू शकतात.

फटाक्यांच्या धुराच्या तीव्र संपर्कात अल्पकाळ राहिल्यानेही श्वसनमार्गांना त्रास होऊ शकतो. विशेषतः ज्यांचे श्वसनमार्ग संवेदनशील आहेत, त्यांना याचा अधिक त्रास होतो, असे डॉ. विश्रवंभर सांगतात.

ते पुढे म्हणतात, दमा किंवा क्रॉनिक ऑब्स्ट्रक्टिव्ह पल्मोनरी डिसीज (COPD - दीर्घकालीन अवरोधक फुप्फुसविकार) असलेल्या व्यक्तींमध्ये या प्रदूषणामुळे आजार अचानक बळावू शकतो किंवा दम्याचा तीव्र झटका येऊ शकतो.

आधीपासून श्वसनमार्गाचा संसर्ग किंवा अन्य श्वसनविकार असलेल्या व्यक्ती तसेच श्वसनसंस्थेवरील शस्त्रक्रियेतून बरे होत असलेल्या रुग्णांनाही प्रदूषित हवेचा अधिक त्रास होऊ शकतो. कारण त्यांचे श्वसनमार्ग आणि फुप्फुसे आधीच काही प्रमाणात कमकुवत किंवा बाधित असू शकतात.

प्रदूषक कण श्वसनमार्गात गेल्यानंतर तेथील आतील आवरणाला उत्तेजित करतात आणि दाहाची प्रक्रिया सुरू होते. त्यामुळे श्लेष्मा किंवा कफाचे उत्पादन वाढते, श्वसनमार्ग अरुंद होतात आणि ते अधिक संवेदनशील बनतात.

चेन्नई येथील SIMS हॉस्पिटलचे पल्मोनोलॉजी विभागप्रमुख आणि वरिष्ठ सल्लागार डॉ. के. थिरुप्पथी यांनी दिवाळीनंतर रक्तातील ऑक्सिजनचे प्रमाण कमी झाल्यामुळे रुग्णालयात दाखल करावया लागलेल्या एका रुग्णाचा अनुभव सांगितला. त्या रुग्णाला पूर्वी दम्याचा कोणताही इतिहास नव्हता; मात्र तो अधूनमधून इनहेलर वापरत असे. प्रदूषणाच्या संपर्कामुळे त्याच्या श्वसनविषयक लक्षणांची तीव्रता वाढली होती. त्याचबरोबर डॉक्टरांनी सांगितलेली औषधे नियमितपणे न घेणे हीदेखील चिंतेची बाब होती, असे ते नमूद करतात.

प्रदूषणाने अतिशय प्रभावित झालेल्या परिसरातून दुसऱ्या ठिकाणी स्थलांतर केल्यानंतर काही रुग्णांच्या श्वसनविषयक तक्रारी कमी झाल्याचेही डॉक्टर सांगतात.

वारंवार प्रदूषणाच्या संपर्कात येणे आणि फुप्फुसांची कार्यक्षमता

अल्पकाळ प्रदूषणाच्या संपर्कात आल्यामुळे होणारा सौम्य त्रास सामान्यतः प्रदूषणाचा संपर्क थांबल्यानंतर कमी होतो. मात्र, श्वसनमार्गांमध्ये दाह निर्माण झाला असल्यास किंवा व्यक्तीला आधीपासून श्वसनविकार असल्यास बरे होण्यासाठी अधिक वेळ लागू शकतो. वारंवार किंवा दीर्घकाळ प्रदूषणाच्या संपर्कात राहिल्यास त्याचे परिणाम अधिक गंभीर आणि दीर्घकालीन असू शकतात.

चेन्नईतील रामापुरम येथील डठच् प्राइम हॉस्पिटलचे वरिष्ठ सल्लागार इंटरव्हेन्शनल पल्मोनोलॉजिस्ट डॉ. सेकर नटराजन सांगतात की, वाऱ्याचा वेग कमी असणे आणि तापमानाचे व्युत्क्रमण (Temperature inversion) यांसारख्या हवामानविषयक परिस्थितींमुळे प्रदूषक कण जमिनीलगतच्या वातावरणात अडकून राहतात. त्यामुळे फटाके वाजवणे थांबल्यानंतरही अनेक दिवस प्रदूषणाची पातळी वाढलेली राहू शकते.

सूक्ष्म कण (Fine particulate matter) आणि नायट्रोजन डायऑक्साइडसारख्या वायूंच्या दीर्घकालीन संपर्काचा संबंध फुप्फुसांची कार्यक्षमता कमी होण्याशी आणि उजझऊ सारख्या दीर्घकालीन श्वसनविकारांचे प्रमाण वाढण्याशी आढळून आला आहे.

श्वसनमार्गांमध्ये सतत दाह राहिल्यास त्यांच्या रचनेत कायमस्वरूपी बदल होऊ शकतात. दीर्घकाळ प्रदूषणाच्या संपर्कात राहिल्याने एम्फिसीमा (एाह्लिशार) आणि पल्मोनरी फायब्रोसिस (झींश्र-ोपरी षळलीीळी) यांसारखे आजार होण्यास हातभार लागू शकतो. तसेच फुप्फुसांच्या कर्करोगाचा धोकाही वाढू शकतो, असे तज्ज्ञ सांगतात.

जून २०२६ मध्ये Scientific Reports या नियतकालिकात प्रकाशित झालेल्या एका संशोधनात इंडो-गंगेटिक खोऱ्यातील १४ शहरांमध्ये दिवाळी २०२४ च्या आसपासच्या काळातील वायुप्रदूषणाचा अभ्यास करण्यात आला. या अभ्यासात असे आढळले की, संबंधित शहरांमध्ये झच२.५ आणि PM10 यांचे प्रमाण राष्ट्रीय मानके आणि जागतिक आरोग्य संघटनेने (थक्ज) निर्धारित केलेल्या २४ तासांच्या मार्गदर्शक मर्यादेपेक्षा तीन ते दहा पट अधिक होते. दिल्ली आणि हिसार येथे दिवाळीच्या काळात झच२.५ चे प्रमाण वाढलेले आढळले.

२०२६ मध्ये Environmental Monitoring and Assessment या नियतकालिकात प्रकाशित झालेल्या आणखी एका संशोधनात उत्तर प्रदेशातील ग्रामीण बागपत परिसरातील ऑक्टोबर आणि नोव्हेंबर २०२४ या काळातील प्रदूषणाचा अभ्यास करण्यात आला. या अभ्यासात दिवाळीच्या रात्री PM2.5 चे प्रमाण प्रति घनमीटर ६३२ मायक्रोग्रॅम इतके नोंदवले गेले. हे प्रमाण सामान्य दिवसांच्या तुलनेत ३.३ पट अधिक होते.

प्रदूषणाचा अधिक धोका कोणाला असतो?

लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि हृदय किंवा फुप्फुसांचे आजार असलेल्या व्यक्तींना प्रदूषणाच्या अचानक वाढलेल्या पातळीचा विशेषतः अधिक धोका असतो.

लहान मुलांची फुप्फुसे अद्याप विकसित होत असतात. दुसरीकडे, वाढत्या वयानुसार फुप्फुसांची कार्यक्षमता आणि श्वसनसंस्थेची नैसर्गिक संरक्षणक्षमता कमी होऊ शकते.

गर्भवती महिलादेखील प्रदूषणाच्या दुष्परिणामांना अधिक संवेदनशील असतात. गर्भधारणेदरम्यान दीर्घकाळ वायुप्रदूषणाच्या संपर्कात राहण्याचा संबंध कमी वजनाच्या बाळाचा जन्म आणि मुदतपूर्व प्रसूती (Premature birth) यांसारख्या प्रतिकूल परिणामांशी आढळून आला आहे. याशिवाय आई आणि गर्भाच्या आरोग्यावर होणाऱ्या संभाव्य दुष्परिणामांकडेही तज्ज्ञ लक्ष वेधतात. आधीपासून कोणताही श्वसनविकार निदान झालेला नसलेल्या व्यक्तींनाही प्रदूषकांचे प्रमाण खूप वाढल्यास तात्पुरता श्वसनविषयक त्रास होऊ शकतो. हा त्रास किती तीव्र असेल हे प्रदूषणाची पातळी, त्याच्या संपर्कात राहण्याचा कालावधी आणि प्रत्येक व्यक्तीची शारीरिक संवेदनशीलता यांवर अवलंबून असते. पूर्वी श्वसनविकाराचे निदान झालेले नाही, याचा अर्थ त्या व्यक्तीवर प्रदूषणाचा काहीही परिणाम होत नाही, असा होत नाही.

प्रदूषणाच्या काळात संपर्क कमी करण्यासाठी काय करावे?

प्रदूषणापासून स्वतःचा संपर्क शक्य तितका कमी करणे हा सर्वांत पहिला उपाय आहे. ज्या ठिकाणी फटाके फोडले जात आहेत अशा परिसरात जाणे टाळावे. प्रदूषणाची पातळी अधिक असताना घराबाहेरील हालचाली आणि कामे शक्य तितकी कमी करावीत, असा तज्ज्ञांचा सल्ला आहे.

अशा वेळी घराबाहेर जाणे अपरिहार्य असल्यास योग्य प्रकारे चेहऱ्यावर बसणारा N95 मास्क वापरल्याने सूक्ष्म प्रदूषक कणांपासून संरक्षण मिळू शकते. सैल बसणारे कापडी किंवा सर्जिकल मास्क झच२.५ कणांपासून तितके प्रभावी संरक्षण देत नाहीत. मास्क नाक आणि तोंडाभोवती व्यवस्थित बसलेला असावा आणि त्याच्या कडांमधून हवा आत जाण्यासाठी फट राहू नये.

प्रदूषणाची पातळी अत्यंत गंभीर असताना घराच्या खिडक्या बंद ठेवणे आणि उपलब्ध असल्यास HEPA फिल्टर असलेले एअर प्युरिफायर वापरणे यामुळे घरातील हवेतील प्रदूषकांचे प्रमाण कमी होऊ शकते.

AQI १५० ते २०० पेक्षा अधिक असताना घराबाहेर व्यायाम करणे टाळावे आणि त्याऐवजी घरातच व्यायाम करावा, असेही तज्ज्ञ सुचवतात.

दमा किंवा COPD असलेल्या रुग्णांनी डॉक्टरांनी सांगितलेली औषधे नियमितपणे सुरू ठेवावीत आणि आपत्कालीन परिस्थितीत वापरायचा रेस्क्यू इनहेलर (Rescue inhaler) नेहमी जवळ ठेवावा.

तसेच घरातील प्रदूषणाचे स्रोत टाळणेही महत्त्वाचे आहे. यामध्ये धूम्रपान, उदबत्त्या आणि मच्छर अगरबत्त्या यांचा समावेश होतो.

ज्या व्यक्तींना श्वसनविषयक तक्रारी सतत जाणवत असतात, त्यांच्या फुप्फुसांची कार्यक्षमता तपासण्यासाठी डॉक्टर स्पायरोमेट्री (Spirometry) ही चाचणी करण्याचा सल्ला देऊ शकतात. रुग्णाची लक्षणे आणि वैद्यकीय स्थिती यानुसार पुढील तपासण्यांमध्ये इमेजिंग आणि इतर चाचण्यांचाही समावेश असू शकतो.


प्रदूषणाच्या अल्पकालीन संपर्कामुळे होणारा सौम्य त्रास संपर्क थांबल्यानंतर फुप्फुसे सामान्यतः भरून काढू शकतात. मात्र, वारंवार किंवा दीर्घकाळ प्रदूषणाच्या संपर्कात राहिल्यास फुप्फुसांची कार्यक्षमता कमी होण्याची प्रक्रिया वेगवान होऊ शकते आणि दीर्घकालीन श्वसनविकार उद्भवू शकतात.

म्हणूनच, दिवाळीनंतर प्रदूषणाची तात्काळ वाढलेली पातळी कमी झाली तरी बाहेरील हवेची गुणवत्ता सुधारणे आणि प्रदूषणाचा संपर्क कमी करणे या दोन्ही गोष्टी अत्यंत महत्त्वाच्या आहेत.

साभार : द हिंदू (इंग्रजी दैनिक)

लेखिका : अथिरा एल्सा जॉन्सन

प्रकाशित / अद्ययावत : ९ नोव्हेंबर २०२६, सायंकाळी ५:४६ वाजता







हे पत्र, मुद्रक निखील जयप्रकाश माने यांनी मालक, प्रकाशक, संपादक अशोक व्यंकटराव चिंचोले यांचे करिता चेतन ऑफसेट प्रिंटर्स, १७ शिवाजी हौसिंग सोसायटी, पद्मानगर बार्शी रोड, लातूर येथे मुद्रित केले. हे पत्रक प्रकाशक अशोक व्यंकटराव चिंचोले यांनी दै. भूकंप कार्यालय, मनपा शॉपींग कॉम्पलेक्स गांधी चौक, लातूर, ता.जि. लातूर ४१३५१२(महा.) येथे प्रकाशीत केले. संपादक- अशोक व्यंकटराव चिंचोले ((:-२५१८२२) RNI NO. MAHMAR/2012/42770

भाऊबीज : ओवाळणीच्या ताटापलीकडचे बहिणीच्या प्रेमाचे ऋण!

– प्रवीण बागडे
मो.क्र. ९९२३६२०९१९

भारतीय संस्कृतीत काही नाती रक्ताच्या नात्यापलीकडे जाऊन मनाच्या गाभाऱ्यात घर करतात. भाऊ आणि बहिणीचे नाते त्यापैकीच एक! कधी बालपणीच्या भांडणांतून उमललेले, कधी एकाच ताटात जेवताना घट्ट झालेले, तर कधी संकटाच्या काळात एकमेकांच्या पाठीशी उभे राहत अधिक समृद्ध झालेले हे नाते आयुष्यभर माणसाला भावनिक आधार देत असते. दिवाळीच्या उत्सवात भाऊबीज हा दिवस या नात्याच्या प्रेमाला, विश्वासाला आणि आपुलकीला उजाळा देतो. बहिण भावाला ओवाळते, कपाळावर टिळा लावते, औक्षण करते आणि त्याच्या दीर्घायुष्याची प्रार्थना करते. भाऊही बहिणीला भेटवस्तू देतो, तिच्या सुखाची काळजी घेण्याचे आश्वासन देतो पण या सगळ्या विधींच्या पलीकडे एक प्रश्न महत्त्वाचा आहे, भाऊबीजेला दिलेले प्रेम आणि संरक्षणाचे वचन आपण वर्षभर पाळतो का?

भाऊबीजेच्या सणामागे यम आणि यमुनेची कथा सांगितली जाते. यम आपल्या बहिणी यमुनेच्या घरी गेला, तिने त्याचे प्रेमाने स्वागत केले, औक्षण केले आणि त्याच्या दीर्घायुष्याची कामना केली, अशी पौराणिक परंपरा प्रचलित आहे. काही कथांमध्ये भगवान श्रीकृष्ण आणि सुभद्रा यांच्या भेटीचाही उल्लेख आढळतो. या कथांमधून बहिणीचे प्रेम, भावाविषयीची आत्मीयता आणि कौटुंबिक नात्यांचे महत्त्व अधोरेखित होते. मात्र, या सणाचा खरा अर्थ केवळ कथांमध्ये किंवा धार्मिक विधींमध्ये शोधण्यापेक्षा तो आपल्या जगण्यात उतरवणे अधिक महत्त्वाचे आहे. लहानपणी भाऊ-बहिणीचे जग किती निरागस असते! खेळण्यावरून भांडण, आईकडे केलेल्या तक्रारी, एकमेकांचे खोडकरपणे घेतलेले उणेदुणे, शाळेतून परतल्यावर वाटून खाल्लेला खाऊ, सणासुदीला नवे कपडे आणि अडचणीच्या वेळी नकळत पुढे केलेला हात. या छोट्या आठवणीच पुढे आयुष्याची मोठी शिदोरी बनतात. काळ बदलतो, घर बदलते, बहिण लग्नानंतर दुसऱ्या घरी जाते, भाऊ आपल्या संसारात रमतो, पण मनाच्या एका कोपऱ्यात बालपणीचे ते नाते कायम जिवंत राहते. बहिण माहेरी आली की घराला पुन्हा एकदा बालपणाचा सुगंध येतो. भावाच्या चेहऱ्यावरही जुन्या आठवणींचे हसू उमटते. पण या सुंदर नात्याचा एक सामाजिक पैलूही आहे.

आपल्या समाजात बहिणीला अनेकदा त्याग, सहनशीलता आणि समर्पण यांचे प्रतीक मानले जाते. ती माहेर सोडते, नवीन घर स्वीकारते, नाती जपते पण तिच्या





स्वतःच्या इच्छा, स्वप्ने आणि अधिकार यांना किती महत्त्व दिले जाते? भाऊबीजेच्या दिवशी बहिणीच्या हातून ओवाळणी करून घेणारा भाऊ तिच्या शिक्षणासाठी, स्वावलंबनासाठी आणि निर्णयस्वातंत्र्यासाठी किती ठामपणे उभा राहतो? तिच्या आयुष्यातील अडचणी समजून घेतो का? तिच्या सन्मानावर कुणी आघात केला तर तिच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहतो का? हे प्रश्न प्रत्येक भावाने स्वतःला विचारले पाहिजेत. बहिणीचे रक्षण करणे म्हणजे तिला चार भिंतींत सुरक्षित ठेवणे नव्हे, तर तिला स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी बळ देणे होय. तिच्या कपड्यांवर, मैत्रीवर, शिक्षणावर, नोकरीवर किंवा जीवनसाथी निवडण्याच्या निर्णयावर नियंत्रण ठेवणे म्हणजे प्रेम नव्हे. खरे प्रेम तिच्या स्वातंत्र्याचा आदर करते. बहिणीला मदतीची गरज असेल तेव्हा तिच्या पाठीशी उभे राहणे महत्त्वाचे; पण ती सक्षम असेल तेव्हा तिच्या क्षमतेवर विश्वास ठेवणेही तितकेच आवश्यक आहे. संरक्षणाच्या नावाखाली तिचे स्वातंत्र्य हिरावून घेणे ही नात्याची नव्हे, तर पुरुषप्रधान मानसिकतेची खूण आहे.

आजही अनेक मुलींना शिक्षणापासून वंचित ठेवले जाते, त्यांच्या स्वप्नांना आर्थिक परिस्थितीचे कारण देऊन रोखले जाते, हुंडा, कौटुंबिक हिंसा, छळ आणि असमानतेला सामोरे जावे लागते. काही ठिकाणी भावाला कुटुंबाच्या मालमत्तेवर अधिकार मिळतो पण बहिणीच्या कायदेशीर हक्कांकडे दुर्लक्ष केले जाते. अशा परिस्थितीत भाऊबीजेच्या दिवशी दिलेली भेटवस्तू कितीही महागडी असली, तरी बहिणीच्या हक्काचा सन्मान नसेल तर त्या भेटीचे मूल्य अपुरेच राहते. बहिणीला मालमत्तेत समान हक्क देणे, तिच्या मताचा आदर करणे, तिच्या संकटात आर्थिक आणि मानसिक आधार देणे, हीच खरी भाऊबीज ठरली पाहिजे. बहिणही भावाच्या आयुष्यात केवळ औक्षण करणारी व्यक्ती नसते. ती त्याची पहिली मैत्रीण, विश्वासू सल्लागार, भावनिक आधार आणि अनेकदा कठीण काळातील निःशब्द शक्ती असते. भावाच्या अपयशात त्याला धीर देणारी, यशात मनापासून आनंद मानणारी आणि त्याच्या चुका स्पष्टपणे सांगण्याचे धैर्य ठेवणारी व्यक्ती म्हणजे बहीण. तिचे प्रेम आंधळे नसते, ते समजूतदार असते. भावाच्या प्रत्येक चुकीला पाठिंबा देणे ही मैत्री नाही, तर योग्य वेळी त्याला योग्य मार्ग दाखवणे हीच खरी आपुलकी आहे.

भाऊबीज साजरी करताना समाजातील निराधार मुली, एकट्या राहणाऱ्या महिला, वृद्ध बहिणी, विधवा आणि संकटात असलेल्या स्त्रियांचीही आठवण ठेवली पाहिजे. प्रत्येक स्त्रीला भाऊ असेलच असे नाही, प्रत्येक बहिणीला तिच्या संकटात धावून येणारा आधार मिळेलच असेही नाही. म्हणून नात्यांची व्याप्ती रक्ताच्या नात्यांपुरती मर्यादित न ठेवता माणुसकीपर्यंत वाढवली पाहिजे. एखाद्या गरजू मुलीच्या शिक्षणाला मदत करणे, बहिणीच्या नावाने वृक्षारोपण करणे, तिच्या आरोग्याची काळजी घेणे किंवा तिच्या स्वप्नांना पंख देणे. या कृती भाऊबीजेच्या आनंदाला अधिक अर्थपूर्ण बनवू शकतात. आज सोशल मीडियावर भाऊबीजेच्या शुभेच्छांचा वर्षाव होतो. सुंदर छायाचित्रे, आकर्षक संदेश आणि महागड्या भेटवस्तूंची देवाणघेवाण होते. पण डिजिटल शुभेच्छांपेक्षा प्रत्यक्ष आयुष्यातील संवेदनशीलता महत्त्वाची आहे. वर्षातून एक दिवस बहिणीला ओवाळणे सोपे आहे, पण वर्षातील प्रत्येक दिवशी तिच्या सन्मानासाठी उभे राहणे ही खरी कसोटी आहे. तिच्या डोळ्यांत आनंदाचे अश्रू आणणारी भेट म्हणजे केवळ दागिना किंवा साडी नाही, तर तिच्या स्वप्नांना दिलेली साथ, तिच्या अस्तित्वाचा केलेला सन्मान आणि तिच्या अधिकारांची केलेली जपणूक आहे.

भाऊबीज हा भाऊ-बहिणीच्या प्रेमाचा उत्सव आहे, पण त्या प्रेमाला समतेची जोड मिळाली तरच तो अधिक सुंदर बनेल. बहिणीने भावाला ओवाळताना त्याच्या दीर्घायुष्याची कामना करावी आणि भावाने बहिणीला तिच्या स्वातंत्र्याने, स्वाभिमानाने आणि सुरक्षिततेने जगण्याचा विश्वास द्यावा. नात्यात अधिकारापेक्षा आदर, बंधनांपेक्षा विश्वास आणि दिखाव्यापेक्षा संवेदनशीलता महत्त्वाची असावी. कपाळावरचा टिळा काही क्षणांत पुसला जाईल, ओवाळणीचे ताट बाजूला ठेवले जाईल आणि भेटवस्तूंचा आनंदही काळाबरोबर कमी होईल, पण बहिणीच्या सन्मानासाठी आयुष्यभर उभे राहण्याचे वचन कधीही पुसले जाऊ नये. कारण खरी भाऊबीज एका दिवसाची परंपरा नाही, ती आयुष्यभर निभावायची जबाबदारी आहे.







लातूर
भूकंप
http://dainikbhukamp.com

पान १ वरून...कर्करोगाची औषधी स्वस्त

८५ औषध कंपन्यांनी १३६४ कर्करोगविरोधी औषधांच्या सुधारित किमती जाहीर केल्या. या माहितीनुसार ६७९ ब्रँड्सच्या किमती ५० टक्क्यांहून अधिक कमी करण्यात आल्या आहेत तर काही औषधांच्या किमतीत तब्बल ९६.४५ टक्क्यांची कपात झाली. एका अंदाजानुसार १ लाख रुपये किमतीचे कर्करोगाचे औषध आता फक्त ४ हजार रुपयांना उपलब्ध होईल. औषधांच्या किमतीतील कपातीमुळे रुग्णांची वार्षिक अंदाजे ३,५४०.३८ कोटींची बचत होण्याचा अंदाज आहे. कमी झालेल्या किमतीत औषधे खरेदी करण्याबाबत जागरूक राहण्यासाठी आणि आपल्या औषधांच्या यादीची तपासणी करण्यासाठी रुग्णांना मार्गदर्शक सूचनाही देण्यात आल्या आहेत. आजपासून रुग्ण 'फार्मा सही दाम' ॲप आणि एनपीपीएच्या वेबसाइटवर नवीन किमती तपासू शकतात.

भारत सातपुते यांचा सत्कार

लातूर : साधारण ४० वर्षापासून साहित्य क्षेत्रात कार्यरत असलेले आपल्या लातूरचे सुप्रसिद्ध जेष्ठ साहित्यिक भारत सातपुते यांनी त्यांच्या वयाएवढे म्हणजे साधारण चौसष्ट पेक्षा जास्त पुस्तके लिहिली आहेत व सव्वाशेच्या आसपास पुरस्कार त्यांना लाभले असून ,त्यांच्या अनेक साहित्याचा हिंदी ,गुजराती व इंग्रजी भाषेत अनुवादही झाला आहे. सध्या त्यांच्या गाजत असलेल्या 'जागरण' या कादंबरीवजा आत्मचारित्राच्या जागर या हिंदी अनुवादित पुस्तकाचा तर महाराष्ट्रासह राजस्थान, मध्यप्रदेश, गुजरात ,कर्नाटक अशा वेगवेगळ्या राज्यात नामवंत साहित्य संस्थांतर्फे पुरस्काराने गौरवही झाला आहे.जागरणला तर दोन वर्षात तीन डझन पुरस्कार मिळाले आहेत. भारत सातपुते हे लातूर येथील ज्ञानप्रकाश सर्वजनिक ग्रंथालयाचे अध्यक्षही आहेत व ते प्रकाश नगरचे रहिवासीही आहेत ही लातूरकरांसाठी अभिमानास्पद बाब आहे.सातपुते यांच्याशैक्षणिक, सामाजिक व साहित्यिक प्रवासाबद्दल त्यांचा ग्रंथालयाच्या वतीने बुधवार दिनांक ११ नोव्हेंबर रोजी सायंकाळी पाच वाजता बार्शी रोडवरील हनुमान मंदिराच्या मागे विधी बाल रुग्णालयाजवळ माधव बावगे यांच्या अभियान निवासस्थानातील ज्ञानप्रकाश ग्रंथालयात जाहीर सत्कार आयोजित केला आहे.

नोंदणी क्र. : Latur/0000116/2018

प्रेरणास्थान

स्व.डॉ.बालासाहेब मा. ठोंबरे-पाटील

कर्मयोगी डॉ.बालासाहेब ठोंबरे-पाटील स्मृती प्रतिष्ठान

स्व.माणिकराव दा. ठोंबरे-पाटील

त्रिमुर्ती भवन, भक्ती नगर, लातूर, ता.जि.लातूर – ४१३५१२

दीपावलीनिमित्त सर्व जनतेस

हार्दिक शुभेच्छा!

श्रीमती प्रभावती बा. ठोंबरे – अध्यक्षा
श्री. जनार्धन दा. ठोंबरे-पाटील – उपाध्यक्ष
श्री. बाळासाहेब रा. सूर्यवंशी – सचिव
श्री. उन्नेश्वर ल. सोनवणे – सहसचिव
श्रीमती अनुराधा बा. ठोंबरे – कोषाध्यक्षा
श्रीमती सुभद्राबाई मा. ठोंबरे – सदस्या
श्री. नेताजी वि. पालकर – सदस्य
श्री. राजेंद्र मा. ठोंबरे – सदस्य
श्री. दिगंबर गो. मोरे – सदस्य

कर्मयोगी डॉ.बालासाहेब ठोंबरे-पाटील स्मृती प्रतिष्ठान
नम्रता · शिक्षण · सेवा · त्याग · सहकार · श्रम

संपर्क : कर्मयोगी डॉ. बालासाहेब ठोंबरे-पाटील स्मृती भवन
मु. पो. उंदरी, ता. केज, जि. बीड - ४३११२३

सर्व लातूरकरांना

दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा !

ही दीपावली आपल्या सर्वांच्या जीवनात आनंद, समृद्धी आणि नवीन उमेदीची, नवचैतन्याची प्रेरणा देो, हीच सदिच्छा !

शुभ दीपावली

घड्याळ तेच वेळ नवी

: शुभेच्छुक :

बाबासाहेब पाटील

सहकारमंत्री, (महाराष्ट्र राज्य)
आमदार, अहमदपूर, चाकूर मतदार संघ

माईर्स एमआयटी पुणेचे

महाराष्ट्र इन्स्टिट्युट ऑफ मेडिकल सायन्सेस ॲन्ड रिसर्च, लातूर
वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, लातूर

प्रा. राहूल वि. कराड
कार्याध्यक्ष व व्यवस्थापकीय विश्वस्त
माईर्स एमआयटी, पुणे

आ. रमेश का. कराड
कार्यकारी संचालक, एम.आय.एम.एस.आर.
वैद्यकिय महाविद्यालय, लातूर

दिपावलीचे मंगलमय पर्व सर्वांना मन:पूर्वक शुभेच्छा...!

शुभ दिपावली

प्रा.डॉ.वि.दा.कराड
संस्थापक अध्यक्ष
एम.आय.टी. वर्ल्ड पिस युनिवर्सिटी, पुणे भारत

संस्थेचे शैक्षणिक उपक्रम

- वैद्यकिय विभाग (मेडिकल इन्स्टिट्युटस्)
- महाराष्ट्र इन्स्टिट्युट ऑफ मेडिकल सायन्सेस ॲन्ड रिसर्च (मेडिकल कॉलेज, लातूर)
- महाराष्ट्र इन्स्टिट्युट ऑफ डेंटल सायन्सेस ॲन्ड रिसर्च (डेंटल कॉलेज, लातूर)
- महाराष्ट्र इन्स्टिट्युट ऑफ फिजीओथेरपी (फिजीओथेरपी कॉलेज, लातूर)
- महाराष्ट्र इन्स्टिट्युट ऑफ नर्सिंग सायन्सेस (बी.एस.सी.नर्सिंग कॉलेज, लातूर)
- डि.एम.एल.टी. कॉलेज, (एम.आय.एम.एस.आर.) लातूर
- श्रीमती प्रयागअक्का कराड आयुर्वेदिक रुग्णालय व संशोधन केंद्र लातूर
- महाराष्ट्र इन्स्टिट्युट ऑफ फार्मास्युटिकल सायन्सेस, लातूर

शाळा व महाविद्यालय

- श्री सरस्वती माध्यमिक विद्यालय, रामेश्वर ता. लातूर
- श्री सरस्वती ज्युनिअर महाविद्यालय, रामेश्वर ता. जि. लातूर
- महात्मा गांधी ग्रामस्वराज्य ट्रेनिंग सेंटर, रामेश्वर ता. जि. लातूर
- श्री मुकुंदराज ज्युनिअर महाविद्यालय, नांदगांव ता. जि. लातूर
- श्री मुकुंदराज माध्यमिक विद्यालय, नांदगांव ता. जि. लातूर
- श्री सरस्वती न्यु इंग्लिश स्कुल (पब्लिक स्कुल), अंबाजोगाई
- श्री इन्स्टिट्युट ऑफ कॉम्प्युटर सायन्सेस, अंबाजोगाई
- डॉ. विश्वनाथ कराड विश्वशांती गुरुकुल, आर्वी ता. लातूर

विश्वनाथपुरम्, अंबाजोगाई रोड, लातूर - ४१३ ५३१. फोन : ०२३८२-२२७४२२/२४, २२८९३९ फॅक्स : ०२३८२-२२७२४६/२२८९३९ टोल फ्री नंबर : १८०० २३३ ३७९४